सा. बां. विभागाकडील कामात अंदाजपत्रकीय परिमाणापेक्षा एखाद्या बाबींचे परिमाणात भरमसाठ वाढ होणे व त्याकरीता उपाय योजना.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २००४/प्र.क्र.८५/रस्ते १.
दिनांक : ११-६-२००४.

संदर्भ-१) शासन परिपत्रक क्र बीडीजी-१०८७/सीआर-३२/इ-२, दि.७-१-१९८९
२) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२००२/प्र.क्र.३७५/रस्ते-५,दि. ६-८-२००२

परिपत्रक

१. संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकान्वये वास्तववादी अंदाजपत्रके तयार करण्याबाबतच्या सविस्तर सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच संदर्भ क्र.२ च्या परिपत्रकान्वये सुधारित प्रशासकिय मान्यतेसाठीच्या अंदाजपत्रकातील त्रुटीबाबत मुळ अंदाजपत्रक तयार करतानाच अशा बाबींचा विचार करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.तथापी सुचनांचे तंतोतत पालन क्षेत्रीय स्तरावरून होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

२. काही विशिष्ट प्रकरणी शासनाचे असे निदर्शनास आले आहे की क्षेत्रीय स्तरावर कामांच्या काही बाबींचे विशेष करुन खोदकाम, पायव्याचे काम, भरावाचे काम, इत्यादी बाबींचे अंतिम परिमाण हे निविदेमधील संबंधित बाबींच्या परिमाणाशी सुसंगत राहत नाही. किंबहुना अशा बाबींच्या परिमाणात प्रचंड प्रमाणात वाढ होते. परिणामी मंजूर अंदाजपत्रक व करण्यात आलेले काम याचा अर्थाअर्थी संबंध उरत नाही व झालेल्या अतिरिक्त खर्चाबाबत उद्‌भवणा-या लेखा आक्षेपांच्या अनुषंगाने, समर्थनीय खुलासा सादर करणे शक्य होत नाही. प्रसंगी लोक लेखा समितीचे आक्षेपास विभागास सामोरे जाणे भाग पडते किंवा महालेखाकार यांचे परिच्छेद वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात.

३. उपरोक्त परिस्थिती टाळणेचे दृष्टीने खालीलप्रमाणे अतिरीक्त निर्देश देण्यात येत आहेत.

३.१ बांधकामाची सविस्तर अंदाजपत्रके संपूर्ण संकल्पचित्रासह, भूस्तरांचे विस्तृत तपशीलासह व अचूक भूमापन पातळयासह काळजीपूर्वक रीत्या तयार करण्यात यावीत. तसेच अशी आरेखने, संकल्पचित्रे, काटछेद इत्यादि मुख्यत्वेकरुन प्रस्तावित बांधकामाच्या वस्तुनिष्ठ परिस्थितीवर आधारित असावीत. अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्याने या बाबतीत सर्वतोपरी काळजी घेऊन व त्या दृष्टीने सखोल तपासणी करुनच तांत्रिक मान्यता प्रदान करावी.

३.२ प्रारुप निविदा प्रपत्रे सक्षम अधिकाऱ्याकडे मंजुरीस्तव सादर करतांना क्षेत्रीय



Scanned by CamScanner

अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र सा.बां.नियमावलीतील परिच्छेद १९८ (१३) मधील तरतुदीनुसार प्रमाणपत्र द्यावे.

३.३ कामाशी संबंधित उप विभागीय स्तरावरील अधिकाऱ्याने निविदेप्रमाणे बांधकामातील बाबी कार्यान्वित करीत असतांना अशा बाबीची प्रत्यक्षातील परिमाणाची निविदेमधील परिमाणासोबत तुलना करुन परिमाणे अनुज्ञेय मर्यादे बाहेर वाढत आहेत किंवा कसे याची वेळोवेळी तपासणी करावी .कामाची देयके तयार करताना या बाबीकडे विशेष लक्ष देणेत यावे. तसेच विभागीय स्तरावर देयके मंजूर करतांना ज्या बाबीमध्ये अश्याप्रकारची वाढ झाली आहे, त्याची माहीती उपविभाकडून त्वरीत मागविण्यात यावी.

३.४ वरीलप्रमाणे तपासणीत एखाद्या बाबीच्या निविदेमधील परिमाणात २५ टक्केचे वर वाढ होणे अटळ असल्याचे उप विभागीय स्तरावर निदर्शनास येताच त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव समर्थनीय कारणमीमांसेसह कार्यकारी अभियंता यांना तात्काळ सादर करावा.

३.५ अनुज्ञेय मर्यादेपेक्षा अधिक परिमाणाचे काम करणे अपरिहार्य असेल तेव्हा

अ) तांत्रिक मंजुरी प्रदान करणाऱ्या अधिकाऱ्याच्या (अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता) निदर्शनास ही बाब तात्काळ आणून पूर्व मंजुरी प्राप्त करणे आवश्यक आहे.

ब) अंदाजपत्रकातील त्रुटींचे संशोधन कार्यकारी अभियंता यांनी करणे बंधनकारक राहील.

३.६ कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्येकडे असे प्रस्ताव प्राप्त होताच अंदाजपत्रकातील अपुरी तरतूद व प्रत्यक्ष बांधकामात वाढणारे परिमाण यातील तफावत कोणत्या करणास्तव उद्भवली याबाबत परिस्थितीजन्य अहवाल तयार करावा. तसेच वाढीव परिमाणाचा कामाचे मंजूर किंमतीवर होणारा एकत्रित परिणाम याबाबत पडताळणी करावी.

३.७ कार्यकारी अभियंता यांनी निवीदा कलम ३७/३८ अन्वये वरीलप्रमाणे अभिप्रायासह प्रस्ताव अधीक्षक अभियंता यांचे मंजुरीस्तव विनाविलंब सादर करावा. तसेच अशा प्रकरणी सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त करणे अपरिहार्य ठरत असल्यास महाराष्ट्र सा.बां.नियमावलीतील परिच्छेद क्र. १३४ अन्वये सुधारित प्रशासकीय मान्यतेकरीता अंदाजपत्रके सक्षम अधिकाऱ्याकडे विनाविलंब सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३.८ अधीक्षक अभियंता किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने अधिक परिमाणाकरिता दर निश्चित करतांना विहित प्राधिकाराची नोंद दर विश्लेषणावर आवर्जून ठेवावी जेणेकरुन दर निश्चिती प्राधिकाराबाबत संभ्रम निर्माण होणार नाही. तसेच अधीक्षक अभियंता यांनी संबंधित बाबींची पाहणी करुन त्याबाबतची वाढीची कारणमीमांसा तपासून

अ) योग्य समर्थन असल्यास अभिप्राय नमूद करुन लिखित आदेश द्यावेत व

ब) अशा प्रकारच्या वाढणाऱ्या परिमाणाबाबत कारणमीमांसा तपासतांना जर सदोष

Scanned by CamScanner

अंदाजपत्रक या अपुरे सर्वेक्षण यासमान कारणांमुळे परिमाण वाढत आहे असे स्पष्ट झाल्यास संबंधितांविरूध्द आवश्यक प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करावी व तदनंतरच मंजुरीबाबत कार्यवाही करावी.

९ ब-१ नमुन्याच्या निविदेमधील खंड ३८ खालील प्रस्तावास क्षेत्रीय अधीक्षक अभियंता यांची मंजुरी प्राप्त झालेवरच तसेच सक्षम तांत्रिक मान्यता अधिक यांनी मान्यता दिल्यानंतर अशा बाबींचे वाढीव परिमाणाचे काम हाती घेण्यात यावे अशा बाबींचे वाढीव परिमाण मात्र वाढ कलमाअंतर्गत विचारात घेण्यात येऊ नये.

१० अनुज्ञेय मर्यादेपेक्षा अधिक परिमाणाचे काम मंजूर करारनाम्याखाली कंत्राटदाराकडून करवून घेतांना उचित लिखीत आदेश देण्यात यावेत.

११ ब-१/ब-२ निविदा कलम ३८/३७ खाली वाढीव परिमाणाचे भुगतान करणेबाबत शासन निर्देश यापूर्वीच निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच वेळप्रसंगी काही बाबी अधिक खुलासेवार स्पष्ट करण्यात आल्या आहेत.

१२ निविदेमधील परिमाणापेक्षा वाढणाऱ्या परिमाणाबाबतचा मुद्दा अधीक्षक अभियंता यांनी त्यांच्या वेळोवेळी होणाऱ्या कामांचे निरीक्षणाच्या वेळी लक्षात घेऊन निरीक्षण टिपणीमध्ये नोंदवावा. जेणेकरुन अशा प्रकरणाचा पुढे पाठपुरावा होऊन ते प्रकरण वेळीच निकाली निघू शकेल.

उपरोक्त प्रमाणे सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(ना. शं. उमाटे)
अधीक्षक अभियंता व उप सचिव (रस्ते),

व्यवस्थापकिय संचालक, म.रा.र.वि.महामंडळ, नेपियनसी रोड, मुंबई.
सर्व मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग,
सर्व अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ,
सर्व कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग,
सर्व अधिकारी/कार्यासन अधिकारी, सा.बां. विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner